25 वर्षे
विकासाची
मिरा भाईंदर महानगरपालिका
"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त कार्यालय

मुख्यालय, २रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in

पुण्यश्लोक 300

जा.क्र. मनपा/ आयुक्त / ०४ /२०२६-२७ दि.०६/०४/२०२६

**प्रत्यायोजन आदेश**

**विषय :- "अतिरिक्त आयुक्त" पदाच्या पदभाराबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील कार्यरत "अतिरिक्त आयुक्त" यांचेकडे सोपविलेल्या विविध विभागांचे पदभाराबाबत यापूर्वी पारित केलेले सर्व आदेश याद्वारे अधिक्रमित करून सदरचे नव्याने आदेश पारित करणेत येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ अन्वये खालील दर्शविलेल्या खात्यांचे/ विभागांचे प्रशासन आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या निरनिराळ्या प्रकरणांत विविध तरतुदीखाली नमुद केलेले आयुक्तांचे अधिकार आणि कर्तव्य, महानगरपालिका आयुक्तांचे सर्वसाधारण नियंत्रणसापेक्ष खालील अतिरिक्त आयुक्त यांच्या नावाखाली दर्शविल्याप्रमाणे या आदेशान्वये सोपविण्यांत येत आहेत.

**अ) डॉ. संभाजी पानपट्टे,** अतिरिक्त आयुक्त (१)

१. सामान्य प्रशासन व आस्थापना
२. निवडणूक व जनगणना
३. अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मुलन व नियंत्रण
४. सुरक्षा
५. घनकचरा व्यवस्थापन
६. परिवहन
७. वाहन व यांत्रिकी
८. पे ॲण्ड पार्क, भुईभाडे
९. मध्यवर्ती भांडार
१०. उद्यान
११. पर्यावरण
१२. संगणक व माहिती तंत्रज्ञान
१३. ई-टेंडरिंग, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा
१४. विधी
१५. लेखा
१६. लेखापरीक्षण
१७. अभिलेख

**ब) श्रीम. प्रियंका राजपूत,** अतिरिक्त आयुक्त (२)

१. अग्निशमन
२. आपत्ती व्यवस्थापन
३. मालमत्ता कर
४. स्थानिक संस्था कर
५. मिळकत
६. परवाना
७. जाहिरात
८. बाजार लिलाव
९. सार्वजनिक आरोग्य
१०. जन्म-मृत्यू
११. पशुवैद्यकीय
१२. समाज विकास (NULM सह)
१३. महिला व बाल कल्याण
१४. शिक्षण
१५. ग्रंथालय
१६. क्रिडा आणि सांस्कृतिक कार्य

उपरोक्त अधिकाऱ्यांनी वरील विभागांचे कामकाज वेळोवेळी त्यांना प्रत्यायोजित केलेल्या आयुक्तांच्या वित्तीय व प्रशासकीय अधिकारांच्या मर्यादेत राहून पहावयाचे आहे. वित्तीय बाबींशी निगडीत सर्व प्रस्ताव/प्रकरण मंजूर करण्यापूर्वी मुख्यलेखाधिकारी व मुख्यलेखापरीक्षक यांची सहमती घ्यावी.

स्थायी समिती, महासभा अथवा केंद्र किंवा राज्य शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावयाचे सर्व प्रस्ताव आयुक्तांचे पूर्व मान्यतेने व मंजूरीनेच पाठविणे बंधनकारक राहील.

वरीलप्रमाणे संबंधित विभागांचे कामकाज पाहत असताना महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त यांनी आपल्या पदावधीत व त्या पदाच्या आधारे पार पाडलेल्या व केलेल्या सर्व कृती व गोष्टी ह्या सर्व प्रयोजनांसाठी आयुक्तांनी पार पाडल्या आहेत व केल्या आहेत; असे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४९ नुसार मानले जाईल.

(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

१. **डॉ. संभाजी पानपट्टे,** अतिरिक्त आयुक्त (१)

२. **श्रीम. प्रियंका राजपूत,** अतिरिक्त आयुक्त (२)

प्रत :- माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

**१. उपायुक्त (सर्व)**

**२. सर्व विभाग प्रमुख / खातेप्रमुख**

**३. आदेशनस्ती.**

प्रत :- माहितीस्तव.

**१. मा. महापौर यांचे स्विय सयिव**

**२. मा. उप-महापौर यांचे स्विय सचिव**

**३. मा. सभापती, स्थायी समिती यांचे स्विय सचिव**

**४. मा. सभापती, महिला व बाल कल्याण समिती यांचे स्विय सचिव**

**५. मा. उपसभापती, महिला व बाल कल्याण समिती यांचे स्विय सचिव**